## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

"ई-निविदा सुचना "

**यांत्रिकी विभाग**

जा.क्र: नांवाशमनपा/यांत्रिकी विभाग/ 1578/२०२५

दिनांक:- 5 MAY 2025

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे खालील दर्शविण्यात आलेल्या कामांकरीता ईनिविदा मागवित आहेत. ही निविदा फक्त नोंदणीकृत महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विद्युत / यांत्रिकी किवा सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत कंत्राटदार इ यांना महापालिकेच्या वेबसाईट www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन खरेदी करता येतील व भरता येतील. निविदेच्या अटी व शर्ती महानगरपालिकेच्या www.nwcmc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

**ई-निविदा वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रकाशीत करणे | 06/05/2025 | १५.०० |
| २ | ई-निविदा डाऊनलोड करणे | 06/05/2025 | १५.०० |
| ३ | ई निविदा भरणे | 06/05/2025 | १५.०० |
| ४ | ई निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 20/05/2025 | १५.०० |
| ५ | ई-निविदा उघडणे | 22/05/2025 | १५.०० |

| अ क्र | वाहने व मशिनरीजचा प्रकार | सुरक्षा अनामत रक्कम रुपये | को-या निविदेची किंमत रुपये | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | **हिंगोली गेट आरयुबी येथील पंप गृहाची देखभाल व दुरुस्ती बाबत.** | २०,०००/- | ६४०/- | **मनपाच्या आवश्यकते नुसार** |

टिप.

कोणतेही कारण न देता ई-निविदा अंशतः/पुर्णतः मंजुर किंवा नामंजूर करण्याचा अंतीम अधिकार मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे.

**अतिरिक्त आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**

- मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाईस्तव :**

- जनसंपर्क अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
- सूचना फलक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
- संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देवुन कळविण्यात येते की, सदर ई-निविदा सुचना महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
- संपादक 1) दै नजरी (3) 2) दै नांदेड रिपोर्टर (3) यांना देवुन कळविण्यात येते की, वरील प्रमाणे दरपत्रक सुचना आपल्या वर्तमानपत्रात दिनांक 08/05/25 रोजीच्या अंकात 12 X 12 चौ.सेमी या आकारात प्रसिध्द करुन देयक व वृत्तपत्राच्या दोन प्रती शासनाच्या मंजुर दरासह अदाईस्तव महानगरपालिका कार्यालयात सादर कराव्यात.

**अतिरिक्त आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

### ई-निविदा सुचना

जा.क्र/.नांवाशमनपा/यांत्रिकी वि/ 1578 /२०२५ दिनांक- 05/05/2025

कामाचे नाव :- हिंगोली गेट आरयुबी येथील पुलाखालील साचलेले पाणी काढणे, वार्षीक देखभाल व दुरुस्ती करणे बाबत.

दरपत्रक धारकाचे नाव :-----------------------------------------------------------------------

पत्ता :-----------------------------------------------------------------------

दुरध्वनी/भ्रमणध्वनी :-----------------------------------------------------------------------

सुरक्षा अनामत रक्कम :- रुपये २०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये वीस हजार फक्त/-)

| अ.क्र. | कामाचे विवरण | दर प्रति महीना रुपये |
|---|---|---|
| 1. | हिंगोली गेट आरयुबी येथील पंप गृहाची देखभाल व दुरुस्ती बाबत. | रुपये अंकात |
| | | रुपये अक्षरात. |

**निविदेकरीता नियम व अटी :**

- निविदा सादर करण्याची कार्यपद्धत:

a. निविदा दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाची असून तांत्रिक लिफाफा मधील माहितीच्या आधारे पात्र ठरणाऱ्या निविदाधारकांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येईल.

**b. तांत्रिक लिफाफा : तांत्रिक लिफाफ्यात खालील कागदपत्राच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील.**

१. कोरी निविदेची किंमत व इसारा रक्कम Payment गेट वे व्दारे Online भरणा केल्याची पावतीची प्रत.

२. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विद्युत / यांत्रिकी कंत्राटदार किवा सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत कंत्राटदार) या दोन्ही पैकी कोणत्याही एका विभागाची नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.

३. पंपीग मशिनरीजचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.

४. पॅन कार्ड (निविदा धारक यांचे स्वतःचे किंवा संस्थेचे)

५. वस्तु व सेवा कर कायद्याखालील नोंदणी प्रमाणपत्र.

६. ईपीएफ / ईएसआय ची नोंदणी प्रमाणपत्रः

७. आरयुबी पंपगृहाकरीता नेमलेल्या कामगारास/पंप चालकास कामगार कायदयातील तरतूदीनुसार वेतन व इतर सुविधा देणे. त्यात त्रुटी आढळून आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

८. कंत्राटदाराने कोऱ्या ई दरपत्रकाची किंमत (Tender Fee) सुरक्षा अनामत रक्कम Online Payment Gateway द्वारे मा. आयुक्त यांचे नावे भरणा करण्यात यावी.

**२. वाणिज्यक लिफाफा :** व्यापारी लिफाफ्यात केवळ निविदेत नमूद केल्याप्रमाणे दर सादर करावे.

**निविदेच्या इतर अटी व शर्ती**

१. निविदाधारकांनी http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन निविदा भरावी.

२. सदर कामाचा कालावधी हा दोन वर्षा करीत राहील व आवश्कतेप्रमाणे कामची मुदत संपल्यास मा. आयुक्त यांच्या मान्यतेने मुदतवाढ मिळाल्यास पुढील निविदा प्रकिया होईपर्यत काम करणे बंधनकारक राहिल.

३. निविदाधारकांनी सर्व दर हे पूर्ण रुपयामध्ये सर्व करासह भरावे.

४. हिंगोली गेट आरयुबी मधिल साचलेले पाणी उपसा करण्यासाठी २४ तास आवश्यक मनुष्य बळ पंप ऑपरेटर पंपगृहामध्ये उपलब्ध ठेवणे बंधनकारक आहे.

५. कंत्राटदाराचे देयके नांवाशमनपाकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार अदाई करण्यात येईल.

६. हिंगोली गेट आरयुबी येथील पंपगृहाचे काम केल्याचे प्रत्येकवेळी लॉगबुक मध्ये नोंद घेऊन देयका सोबत दोन प्रतित छायांकित प्रत देणे व आवश्यकतेनुसार Photo /GPS Photo सादर करणे आवश्यक आहे.

७. हिंगोली गेट आरयुबी च्या रस्ता लगतच्या नाल्यातील व संप मधील गाळ वेळोवेळी उपसा करणे व बाहेर नेऊन टाकणे, नालीवरील लोंखडी जाळया वेळोवेळी आवश्यकतेनुसार दुरुस्त करणे जसे वेल्डीग करणे जाळीचे एंगल रॉड इ. नवीन बसविणे, तसेच दोन्ही बाजूचे नविन गेट बॅरीकेटींग बसविणे व त्या गेटचे/बॅरीकेटीगंची वेळोवेळी दुरुस्ती करणे व हिंगोली गेट आरयुबी मध्ये जास्त पाणी साचल्यास गेट बंद करणे व पाणी कमी झाल्यास गेट उघडणे, मशिनरीजने पाणी उपसा करणे आणि वाहतूक रहदारीकरीता रस्ता उपलब्ध करुन देणे इ सर्व कामे कंत्राटदारास करणे बंधनकारक असेल.

८. दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे, निविदेतील अटी व शर्ती अंशत: व पुर्णत: बदल करण्याचा सर्व अधिकार मा. आयुक्त, नांवाशमनपा, नांदेड यांचेकडे राखुन ठेवले आहे.

९. सदर निविदे संदर्भातील कोणताही न्यायालयीन खटला नांदेड जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात चालविला जाईल.

१०. तांत्रिक बिघाडामुळे काही कारणास्तव पाणी काढणे व शक्य नसल्यास लोंखडी क्रॉसबार/गेट/बॅरिकेटिंग टाकून वाहतूक अडविण्याचे काम कंत्राटदाराचे राहिल. तसेच मनपाच्या मशिनरीज नादुरुस्त असल्यास ते दुरुस्त करणे अथवा आवश्यकता असल्यास कंत्राटदाराने ते स्वखर्चाने मशिनरीज पुरवठा करुन पाणी उपसा करावा लागेल सदर देयक मनपा अदाई करणार नाही.

११. हिंगोली गेट आयुबी करीता दोन्ही बाजूने नविन गेट/बेरिकेटिंग कंत्राटदाराचे कार्यकाळात आवश्यकते नुसार दुरुस्त करणे व कार्यकाळ संपल्यावर मनपाकेस हस्तांतरीत करणे.

१२. विद्युत देयक अदाई व आवश्यक डिझेल पुरवठा महापालिका करेल.

१३. काळया यादी नसल्याबाबतचे घोषणापत्र सादर करणे.

१४. निविदा धारकाच्या देयकातून नियमानुसार आयकर व जीएसटी त्यावरील अतिरिक्त कर कपात करण्यात येईल. निविदधारकास कोणत्याही प्रकारची अग्रीम रक्कम देण्यात येणार नाही.

१५. हिंगोली गेट आरयुबी पुलाखाली कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे पाणी साचुन राहिल्यास व रहदारी बंद झाल्यास प्रति दिवस १०००/- रुपये याप्रमाणे कंत्राटदाराच्या देयकातून दंड आकारण्यात येईल.

१६. हिंगोली गेट आरयुबी मधील कामकाज करीत असताना कोणत्याही प्रकारचे सजीव अथवा निर्जीव अपघात झाल्यास नुकसानीची भरपाई करण्याची जबाबदारी कंत्राटदारवर राहील.

१७. या ई निविदेत सादर करण्यात आलेले सर्व कागदपत्रे खरे असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे. तसेच खोटे आढळून आल्यास आपणावर कायदेशीर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल यावी कंत्राटदाराने नोंद घ्यावी.

१८. ई निविदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे.

| | | | |
|---|---|---|---|
| उप अभियंता (यांत्रिकी)<br>नांवाशमनपा, नांदेड | शहर अभियंता<br>नांवाशमनपा, नांदेड | अतिरिक्त आयुक्त<br>नांवाशमनपा, नांदेड | दरपत्रक धारकाची स्वाक्षरी |